**पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ आय. डी. शेख यांचे तर्फे पुन्हा शपथेवर सुरु–**

आमचे शेताच्या उत्तरेस असणारे भगवान गोफणे यांची शेतजमीन त्यांनी भारत बुरुंगे यांना विकलेली आहे. मला कळायला लागल्यापासुन मला ती जमीन विकल्याची माहिती आहे. भारत बुरुंगे हा आमचे भावकीतील नाही. आमचे शेतातुन उत्तरेकडे सडकेवर जाणेसाठी रस्ता नाही. आम्ही भारत बुरुंगे यांचे शेतातुन जातो. तेव्हा त्यांचे शेतात वाहनाने गेल्यामुळे चका–या पडतात. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे शेतातुन आमच्या सर्वांच्या वाहनाच्या वेगवेगळया चका–या पडतात. सगळे एकाच ठिकाणी हुन जातात. एकाच ठिकाणी चका–या पडलेल्या असतात. हे म्हणणे खरे नाही की, ज्या एकाच ठिकाणाहुन आम्ही बुरुंगेच्या शेतातुन निघतो त्या ठिकाणी मुरुम, माती टाकलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या रस्त्याने आम्ही भारत बुरुंगे यांचे शेतातुन उत्तरेकडे जातो तो रस्ता उत्तरेकडुन दक्षिणेपर्यंत नदीपर्यंत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ मधुकर यांचे शेतात वाटणीस लागुन पश्चीम बाजुस कोप–यात त्याची वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती वस्तीचे ठिकाण इतर जमीनीपासुन उंचावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या वस्तीच्या दक्षिणेला जमीन खोलगट आहे व उत्तर बाजु चढावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, उत्तरेकडुन दक्षिणेकडे उतार आहे. हे म्हणणे खरे नाही की, दक्षिणेकडील जमीन उत्तरेपेक्षा १० फुट खोल आहे. दक्षिणेकडील जमीन उत्तरेकडील जमीनीपेक्षा २० ते २५ फुट खोल आहे. ज्ञानदेव, श्यामराव व वसंत यांचे जमीनीच्या दरम्यान वादी मधुकर याची जमीन नाही. माझ्या जमीनीत व भिमराव यांचे जमीनी दरम्यान बांध नाही. बांध नसल्याचे कारण मी सांगु शकत नाही. माझ्या जमीनीला वादी मधुकर याने काहीही केलेले नाही.

कोर्ट कमिशनर म्हणुन देवकर वकिल आले होते त्यावेळेस मी नव्हतो. मला माहिती नव्हते की, माझे वडील हजर होते किंवा कसे. चंद्रकांत सुब्राव गोफणे व

लालासाहेब भिमराव देशमुख तसेच भरत संभाजी लोंढे हे माझ्या गावातील आहेत. हे मला माहिती नाही की, लालासाहेब भिमराव देशमुख तसेच भरत संभाजी लोंढे हे दिनांक १७.०९.२०१४ रोजी देवकर वकिलांनी केलेल्या पंचनाम्यास पंच म्हणुन हजर होते. हे मला माहिती नाही की, दिनांक २१.१२.२०१४ रोजी चंद्रकांत सुब्राव गोफणे व लालासाहेब भिमराव देशमुख हे देवकर वकिलांनी केलेल्या पंचनाम्यास पंच म्हणुन हजर होते. चंद्रकांत सुब्राव गोफणे माझ्या चुलत्याचा मुलगा आहे. माझे चुलते या दाव्यात पक्षकार नाहीत. चंद्रकांत सुब्राव गोफणे व लालासाहेब भिमराव देशमुख तसेच भरत संभाजी लोंढे यांचेशी माझा वाद नाही. हे मला माहिती नाही की, माझे वडील वसंत विठ्ठल गोफणे हे पंचनाम्यास हजर होते व त्यावर त्यांचा अंगठा आहे. हे मला माहिती नाही की, देवकर वकिलांनी सडकेपासुन ते नदीपर्यंत रस्त्याची पाहणी केली. हे म्हणणे खरे नाही की, सडकेपासुन ते वस्तीपर्यंत रस्ता दिसला व तेथुन खाली नदीपर्यंत पाणंद दिसला. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, तेथे रस्ताही नाही व पाणंद ही नाही. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पाणंदची रुंदी १७ फुट व काही ठिकाणी १४ फुट होती. हे म्हणणे खरे नाही की, पाणंद मधुकर तसेच भिमराव जगताप यांच्या जमीनीपेक्षा खोल होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या पाणंदीच्या दोनही बाजुला पुर्वेला व पश्चीमेलाही दोन दोन फुटाचे रुंदीचे व ३ उंचीचे बांध आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दोनही बांधावर वस्तीपासुन नदीपर्यंत काटेरी झुडुपे आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्व प्रतिवादींचे आपसांत संगनमत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दाव्यांचा खर्च सर्व जण मिळुन करीत आहोत. मला भाऊ नाही, मी एकटाच आहे. मी साक्ष प्रतिवादी क्र. ३ ते ६ तर्फे देत आहे. मी भिमराव बाबुराव जगताप, श्यामराव देवराव गोफणे, वसंत विठ्ठल गोफणे, ज्ञानदेव सुर्यभान गोफणे यांचेसाठी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी मधुकर ने प्रतिवादीं क्र. ७ व ८ यांचे अर्धा एकर शेतावर अतिक्रमण केले हे मी खोटं सांगत

आहे. मी अतिक्रमण करताना १४–१५ वर्षांपुर्वी पाहिलेले आहे. मला वर्ष सांगता येणार नाही. मी वादीला अतिक्रमण करु नको असे सांगितले होते त्यांनी ऐकले नाही. त्यावेळेस माझे वय २५ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, हलक्या भारी वाटण्या झाल्यामुळे कोणाला कमी कोणाला जास्त क्षेत्र आले. हे म्हणणे खरे नाही की, मारुतीची जमीन हलकी आहे ती पुर्व बाजुला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमीनीत मेहनत करुन जमीन बागायती करुन ऊस लावले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कग्र. ७ व ८ यांची जमीन बागायत नाही. आमचा दावा सगळयांच्या जमीनी मोजण्यासाठी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीमध्ये मधुकरची जमीन जास्त निघाल्यास ती आम्हाला ताब्यात घ्यायची आहे. हे म्हणणे खरे नाही की, पाणंद नाही, रस्ता नाही हे मी खोटं सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच पाणंदीने आम्ही नदीपर्यत जातो. हे म्हणणे खरे नाही की, मी राजकारणात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे मनुष्यबळ जास्त असल्याने मी मधुकर व मोहन यांना त्रास देत आहे. हे म्हणणे खरे नाही की,  मी खोटा सरतपास दाखल केला व खोटी साक्ष दिली.

उलटतपास पुर्ण

फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.28 17:29:57 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२८.०७.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा